(नियम ३ पहा)

**महाराष्ट्र जमीन महसुल (जनजातीच्या व्यक्तींनी जनजातीएतंर व्यक्तीकडे भोगाधिकार हस्तांतरीत करणे) नियम १९७५ याच्या नियम-३ अन्वये द्यावयाची जाहीर नोटीस**

ज्याअर्थी अपर जिल्हाधिकारी,मालेगांव यांच्याकडे सोबत जोडलेल्या अनुसुची मध्ये नमुद केलेल्या **श्री. विश्वास नाना पिठे रा. मानुर ता. कळवण जि. नाशिक** यांच्या मालकीच्या जमीनीचा मोबदल्याच्या रुपाने भोगाधिकार घेण्यासाठी अर्ज आलेला आहे.

अर्जदाराने उक्त जमीनीच्या अकृषिक प्रयोजनाच्या बाबतीत मोबदल्याच्या रुपाने अकृषिक प्रयोजनार्थ मिळकत नामे **सौ. स्वाती रोहित पगार रा. एकलहरे रोड, फुलाबाई चौक, कळवण ता. कळवण जि. नाशिक** यांना खालील अनुक्रमांक ८ मध्ये समाविष्ठ करण्यात आलेल्या रक्कमेला विक्री करण्याचे ठरविले आहे.

आणि ज्याअर्थी **मौजे वाडी बु. ता. कळवण जि. नाशिक** या गावामध्ये अथवा त्यापासुन ५ कि.मी. परिसरात राहणारी जर एखादी जनजातीय व्यक्ती मालकाकडुन भोगाधिकार स्विकारण्यास तयार असेल तर कलम ३६ अ पोट कलम (१) च्या परंतुकाच्या उपबंधान्वये दिला अग्रकम घ्यावयाचा आहे.

त्याअर्थी ज्या जनजातीय व्यक्ती **मौजे वाडी बु. ता. कळवण जि. नाशिक** गावाच्या रहिवासी आहेत अथवा त्यांच्या पासुन ५ कि.मी. च्या परिसरात राहत आहेत आणि ज्यांची मिळकतीचे मालक **श्री. विश्वास नाना पिठे रा. मानुर ता. कळवण जि. नाशिक** यांच्याकडून विक्री / गहाण / भाडेपट्याव्दारे भोगाधिकार स्विकारण्याची त्यासाठी मोबदल्याच्या रुपाने देण्याची तयारी आहे अशा व्यक्तींना प्रदान करुन त्यांच्या नांवे विक्री इत्यादी देण्यासंबंधीचा अर्ज या नोटीसीच्या प्रसिध्दीच्या तारखेपासुन १ महिन्याचे आत खालील सही करणाराकडे सादर करण्याचे आव्हान करण्यात येत आहे.

**अनुसुची भोगाधिकाराचे वर्णन**

| जिल्हा | तालुका | गांव | स.नं./ ग.नं. | क्षेत्रफळ हे.आर | आकारणी रुपये पैसे | जनजातीएतर हस्तांतर कर्त्याचे नांव व पत्ता | जमीनीची किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| नाशिक | कळवण | वाडी बु. | २५६ | १ हे ४७ आर पो. ख. ० हे १६ आर एकुण १ हे ६३ आर यापैकी **१ हे २३ आर** | रुपये १.५०पैसे | **जमीन मालक -** श्री. विश्वास नाना पिठे रा. मानुर ता. कळवण जि. नाशिक **जमीन घेणार -** सौ. स्वाती रोहित पगार रा. एकलहरे रोड, फुलाबाई चौक, कळवण ता. कळवण जि. नाशिक | **किंमत रु. १६,००,०००/- (अक्षरी सोळा लाख रुपये मात्र)** |

**अपर जिल्हाधिकारी कार्यालय,मालेगाव.**
**क्रमांक/आदि.ते बिगर आदि/एस आर/१७/२०२०**
**मालेगांव दिनांक : २९ /१०/२०२०**

स्वाक्षरित xxx
(धनंजय निकम)
**अपर जिल्हाधिकारी,मालेगाव**

प्रत : राष्ट्रीय सुचना विज्ञान केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक यांचेकडेस
२/- सदरची नोटीस शासनच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस विनंती आहे.

(धनंजय निकम)
**अपर जिल्हाधिकारी,मालेगाव**

अपर जिल्हाधिकारी मालेगांव जि. नाशिक
सत्यमेव जयते